संं.फौ.ख.क्र. १२८०/२०१९
सरकार वि. रामप्रसाद
निशाणी क्र. १९

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – डॉ. योगेश नारायण चौधरी
वय – ३६ वर्ष, व्यवसाय – वैद्यकीय अधिकारी,
राहणार – जी.एस.सी., नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे**

१. माझे शिक्षण एमबीबीएस पर्यंत झालेले आहे. दिनांक ०१.०३.२०१३ रोजी मी कन्हान येथील प्राथमीक आरोग्य केंद्र येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होतो. दिनांक ०५.०५.२०१९ रोजी पोलीस स्टेशन कन्हान यांनी मला अपघातातील जखमींची तपासणी करण्यासाठी दोन पत्र दिले होते. सदर दोन्ही पत्र आता मला दाखवीले. ते तेच असून त्यावर माझी स्वीकारणार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र. २० व २१** देण्यात येते. मी दोन्ही जखमींची तपासणी केली.

२. त्यातील एका जखमीचे नाव मंगेश अशोकराव ठाकरे असे होते. त्याला तपासणीदरम्यान सात प्रकारच्या जखमा झाल्याचे दिसले. त्यापैकी सहा जखमा किरकोळ स्वरूपाच्या होत्या व एक जखम गंभीर स्वरूपाची त्याच्या चेह–यावर होती. सदर जखमीवर प्राथमीक उपचार करून त्याला पुढील उपचारसाठी मेडीकल हॉस्पीटल, नागपूर येथे पाठवीले. आता मला मेडीको लिगल सर्टीफिकेट दाखविले ते तेच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी, पोलीसांची व जखमींची सही आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते.

३. दुस–या जखमीचे नाव नरेश ठाकरे असे होते. त्याला तपासणीदरम्यान चार प्रकारच्या जखमा झाल्याचे दिसले. चारही जखमा किरकोळ स्वरूपाच्या होत्या. सदर जखमीचा रक्तदाब वाढल्यामुळे त्याला पुढील उपचारसाठी मेडीकल हॉस्पीटल, नागपूर येथे पाठवीले. आता मला मेडीको लिगल सर्टीफिकेट दाखविले ते तेच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी, पोलीसांची व जखमींची सही आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

सं.फौ.ख.क्र. १२८०/२०१९
सरकार वि. रामप्रसाद
निशाणी क्र. १९

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. वासनीक यांच्यातर्फे.**

हे म्हणणे खरे आहे की नि.क्र. २२ व २३ मधील जखमा गाडी स्लीप होवून रस्त्यावर पडल्यास होऊ शकतात.

**उलटतपास संपला**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

सही/-

ठिकाण –कामठी

**(रा.र. शेरेकर)**

दिनांक –०८/१२/२०२३

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.